# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 21/08/2021 (शनिवार)

(दुपार)

---

### शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो. स्टे. बोरी :– फिर्यादी नामे– सौ. कविता सुरज पवार, वय 21 वर्ष, रा. दहेगाव इंदिरा नगर ता. सेलु जि. वर्धा, ह. मु. वार्ड क्र. 4 रूईखैरी जि. नागपुर व आरोपी नामे– 1) पति– सुरज देवीदास पवार यांचे सन 2020 मध्ये रितीरिवाजाप्रमाणे लग्न झाले. त्यानंतर फिर्यादीला काही दिवस चांगले वागणुक देवुन नंतर आरोपी क्र 1) सुरज पवार 2) देविदास पळसराम पवार, 3) दीपक देविदास पवार यांनी ''तु आपल्या आई वडीला कडुन भावांचा लग्नाकरिता पैसे घेवुन ये'' फिर्यादीचे आई वडील गरीब असल्याने त्यांनी 50,000/–रू. त्यांना दिले. तरी सुध्दा आरोपीतांनी तिला शारीरिक व मानसिक त्रास देवुन तिचा छळ केला. फिर्यादीचे रिपोर्ट वरून आरोपी क्र. 1) पति– सुरज पवार 2) देविदास पळसराम पवार, 3) दीपक देविदास पवार, 4) मेघा देविदास पवार, 5) मिनाक्षी अनिल जाधव, 6) सिमा भिम पवार सर्व रा दहेगाव इंदीरा नगर ता सेलु जि वर्धा, 7) शिवानी भोयर रा हिंगणघाट जि वर्धा यांच्या विरूध्द सदरचा गुन्हा नोंद आहे. सदरचे घटनास्थळ हे पो.स्टे सेलु जि वर्धा येथील असुन सदर गुन्हाचा तपासाचे कागदपत्र पुढील तपासा कामी संमंधीत पोस्टे. ला वर्ग करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीतांविरुध्द कलम 498 (अ), 504, 506 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक श्रीमती आरती उघडे या करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. रामटेक – दिनांक 20/08/2021 चे 15.00 वा. ते 15.30 वा. चे सुमारास पो.स्टे. रामटेक हद्दीत फिर्यादीयांची वय 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी हिला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री कावळे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर